REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# 'साहित्य अकादमी'




प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

## प्रास्ताविक:

भारतीय साहित्यामध्ये साहित्य अकादमीचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वांतत्र्य प्राप्त झाले. लोकशाही मूल्यांचा स्वीकार भारतीय समाजव्यवस्थेने केला. अहिंसा, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. एकूणच भारतीय लोकमानसाच्या मानसिक, बौध्दीक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, वैज्ञानिक जीवनदृष्टीमध्ये कालपरत्वे अमूलाग्र बदल होत गेल्याचे दिसून येते.

भारतीय साहित्याला प्राचीन परंपरा आहे. इ.स.१२ शतकापासून या परंपरेचा शोध घेता येतो. अशी प्रदिर्घ कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेले भारतीय साहित्य वेगवेगळया भाषांद्वारे समाजात प्रस्थापित होत आले आहे. वर्तमान स्थितीत होत आहे. कालपरत्वे साहित्याच्या जडण-घडणीत आमुलाग्र बदल होत आलेल्याची नोंदी इतिहासात पहावयास मिळतात. कालखंडानुरुप साहित्य निर्मितीला प्रोत्साहित आणि प्रेरित करणाऱ्या विविध संस्था प्राचीन काळापासून कार्यरत असल्याचे पहावयास मिळते. बदलत्या कालखंडानुरुप आणि राजसत्तेनुरुप साहित्याच्या कक्षा विस्तारत गेल्या आहेत. इंग्रजी राजवटीपासून जीवनाचा आविष्कार परिधान केलेले साहित्य आज उच्चतेच्या सर्वोच्च टोकाला पोहचले आहे. वर्तमान काळात भारतीय भाषातील साहित्याला वृध्दींगत करण्यासाठी अतुलनिय आणि महत्वपूर्ण कार्य करणारी संस्था म्हणून 'साहित्य अकादमी' सर्व परिचित झाली आहे.

दि.१२ मार्च १९५४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्थापन झालेली ही संस्था आज ५० वर्षे पूर्ण करीत आहे. भारतीय साहित्याचा सक्रीय विकास करणारी ही संस्था आज लेखकांच्या जीवनात प्रतिष्ठेची म्हणून गणली जातेय. साहित्याचे मानदंड निश्चित करणे, भारतीय भाषेतील, साहित्यिक देवाणघेवाणीमध्ये समन्वय साधणे आणि या माध्यमातून देशाची सांस्कृतिक एकता व एकात्मता टिकविणे तसेच उत्तमोत्तम साहित्य निर्मितीस चालना देणे या उदात्त उद्दीष्टांना घेऊन प्रस्थापित झालेली ही संस्था आज मोठया नावारुपाला आलेली आहे. साहित्य अकादमीमुळे सांस्कृतिक व भाषिक भिन्नतेतएकता निर्माण करण्यास मोठी मदत झालेली आहे. भारतीय समाजातील वैविध्यपूर्ण भाषांत अनुबंध निर्माण करण्याचे महनीय कार्य साहित्य अकादमीने केले आहे. भारतीय भाषांतील साहित्याला सातासमुद्रापलिकडे नेण्यात साहित्य अकादमीने महत्वाची भूमिका बजावली आहे.

भारतीय सामाजिक जीवन हे विविधतेने नटलेले आहे. भारतीत विविध समाज आपल्या भाषा, संस्कृती, रुढी, परंपराची जोपासना करत जीवन जगत आहेत. या विविध सामाजिक जीवनाला अधोरेखित करणारे त्या त्या समाजाची भाषा अंगिकारुन अविष्कृत होणारे विपूल साहित्य आज निर्माण होत आहे. या वेगवेगळया भाषांमधून निर्माण होणारे सकस व समृध्द वाङ्मय हे प्रत्येकांच्या परिचयाचे असतेच असे नाही. आपआपल्याच भाषेतील साहित्याशी आपण परिचित होतो. ही भाषिक मर्यादा ओलांडून या सकस आणि समृध्द साहित्याशी परिचय घडून आला तो साहित्य अकादमीमुळेच. साहित्य अकादमी अखिल भारतीय स्तरावरील उत्तम साहित्याची निवड करते. यामुळेच भारतीय स्तरावर मराठी साहित्याची व्यापकता, श्रेष्ठता तपासण्यास मदत होते आणि म्हणूनच सर्व भाषांमधील लेखक, वाचक व समीक्षक यांचे अनुभवविश्व समृध्द करणारी एक महत्वपूर्ण साहितय संस्था म्हणून साहित्य अकादमी मान्यता पावली आहे.

भारतीय राज्यघटनेने २२ भारतीय भाषांना मान्यता दिलेली आहे. या २२ भाषांतून प्रकाशित होणाऱ्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण कालाकृतींना वेगवेगळया निकषांची कसोटी ठेवून साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करते. या स्वायत्त संस्थेमार्फत सर्वोकृष्ट स्वतंत्र तसेच अनुवादित ग्रंथास पुरस्कार दिला जातो. सन १९५५ ते २०१२ पर्यंत पुरस्कारप्राप्त ग्रंथांमध्ये इतिहास, संस्कृती, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी, कथा, कविता, संशोधन, भाषा शास्त्र, लघुनिबंध, लघुकथा, नाटक अशी वैविध्यपूर्णता असल्याचे निदर्शनास येते. अशा वैविध्यपूर्ण साहित्यकृतींच्या निवडीबाबतची पारदर्शकता साहित्य अकादामीचे खास वेगळेपण सिध्द करते. वेगवेगळया साहित्य प्रकारातून वेगवेगळया

विषयांना साकारणाऱ्या या साहित्यकृती त्या त्या काळातील मैलावरचा दगड ठरलेल्या, नवीन प्रवाह निर्माण करणाऱ्या आणि समकालीनात वेगळेपण सिध्द करणाऱ्या आहेत. म्हणूनच त्या वैशिष्टयपूर्ण व पुरस्कारास सार्थ ठरल्या आहेत.

साठोत्तरी वाङ्मय प्रवाहातील दलित, ग्रामीण देशी इ. प्रवाहातील वेगवेगळया साहित्यकृतींना आजवर साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्कार प्राप्त साहित्यकृतींनी मराठी साहित्य विश्वाला समृध्द केले आहे. अशा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त श्रेष्ठ कलाकृतींचा वैचारिक भूमिकेतून विचार करताना साहित्य अकादमीची संकल्पना, स्वरुप व वाङमयीन वृध्दी विचारात घेणे मला महत्वाचे वाटते.

भारतामध्ये भाषापरत्वे राज्याची निर्मीती झाली, त्यामुळे भारतीय भाषा आणि भाषिक साहित्याची जडणघडण कालपरत्वे होत गेलेली आहे. भाषा, समाज, साहित्य आणि संस्कृती यांमध्ये ऋणानुबंध असल्याचे दिसून येते. भारतीय साहित्याच्या जडणघडणीमध्ये "साहित्य अकादमीचे" वाङ्मयीन कार्य अत्यंत महत्वाचे आहे. कारण एकभाषिक असलेल्या साहित्याकृतीला राष्ट्रीय साहित्याचा दर्जा प्राप्त करुन देण्याचे कार्य साहित्य अकादमीमुळे प्राप्तझाल्याचे दिसून येते. त्याविषयी प्रभाकर क्षेत्रिय म्हणतात की, "प्रांतीय भाषाओ को भी राजभाषाओं का दर्जा दिया गया और इसके सन्मृर्तन के लिए भाषावार प्रांतो की रचना की गई शिक्षा यद्दापि प्रांतो का विषय था (और है।) परंतु भाषाओं के सामंजस्य के लिए शिक्षा में त्रिभाषा सुत्र पर सहमती बनी। इसके अंतर्गत हर प्रदेश में स्कूली शिक्षा के स्तर पर पहली मातृभाषा, दुसरी राज्यभाषा या राष्ट्रभाषा और तिसरी विदेशी भाषा के पाठयक्रम में शामिल करना था। शिक्षा का माध्यम मातृभाषा स्वीकार की गई ।"

प्रभाकर क्षेत्रिय यांनी भारतीय भाषेचे महत्त्व स्पष्ट करताना राज्यपरत्वे प्रत्येक भाषा ही अत्यंत महत्वाची आहे. मातृभाषा, राष्ट्रीय भाषा आणि विदेशी भाषा सुत्रातून शिक्षण दिले जाते. परंतु मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची वैचारिक भूमिका महत्वाची असल्याचे दिसून येते. प्रादेशिक भाषेतील साहित्यातून त्या त्या भूप्रदेशातील लोकजीवन, त्यांची सामाजिक संस्कृती, राजकीय लोकपरंपरा तसेच त्यांच्या जीवनशैलींच्या वेगवेगळ्या वैशिष्टयांची अभिव्यक्ती साहित्यातून होत असते. त्यामुळे प्रादेशिक लोकजीवनाची समृद्ध परंपरा साहित्यात होत असल्यामुळे साहित्य अकादमीने भारतीय प्रादेशिक साहित्याला राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक ऐक्य भारतीय लोकमनात निर्माण करण्याचे एक अलैकिक कार्य साहित्य अकादमीने केल्याचे दिसून येते. या संदर्भात आपले मत मांडताना प्रा.सुहास निर्मळे साहित्य अकादमीविषयी म्हणतात की, "भारत देश हा समृद्ध, सांस्कृतिक व वाङ्मयीन परंपरा लाभलेला प्रदेश आहे. मुद्रणतंत्र भारतात आले आणि लेखन प्रक्रिया अधिक गतिमान झाली. ब्रिटीश काळात दक्षिण प्राईज कमिटीतर्फे ग्रंथोत्तेजनासाठी ग्रंथ पुरस्कार देण्याची प्रथा सुरु झाली. आज भारत देशात १५ भाषांमध्ये जे लेखन वाङ्मयीनदृष्टया वेगळे आहे. अशा वाङ्मयीन लेखनास, कलाकृतीस भारतीय साहित्य अकादमी विशेष ग्रंथ पुरस्कार देते व कलाकृती निर्मात्या, लेखक, कवींचे कौतुक करुन गौरव करते."[२] प्रा.सुहास निर्मळे यांनी भारतीय संस्कृती व वाङ्मय यांना लाभलेली परंपरा किती जुनी आहे हे सांगून पूर्वीपासूनच ग्रंथनिर्मितीसाठी कसे उत्तेजन दिले जात होते ते स्पष्ट केले आहे आणि याच पार्श्वभूमीवर साहित्य अकादमी आज वर्तमान स्थितीत कसे महत्वपूर्ण कार्य करत आहे तेही सांगितले आहे.

### मराठी वाङ्मय

मराठी वाङ्मय विश्वात कथा, कादंबरी, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांची मोठी परंपरा आहे. मराठी वाङ्मयात या साहित्यप्रकारांनी कालखंडानुसार मोठी भर घातली आहे. मराठी वाङ्मयाच्या कक्षा या साहित्य प्रकारांनी मोठया प्रमाणात वाढविल्या. मराठी विश्वाचा विस्तार व विकास साधला आहे. कथा आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारांना एक जूनी परंपरा असून, मानवी समाजाच्या जीवन व्यवहाराबरोबर प्रवास करणारे हे वाङ्मयप्रकार विशेष नावारुपाला आलेले आहेत. विविध घटकांनी एकत्रित बंदिस्त झालेले हे वाङ्मयप्रकार समग्र मानवी जीवनाशी सुसंवाद साधित असल्याने, मानवी जीवनाशी, त्यातील घटना व प्रसंगाशी या वाङ्मय प्रकारांची नाळ जोडली गेली आहे.

कथा आणि कांदबरी यांचा विस्तार मोठा असल्याने, समग्र मानवी जीवनाचा पट यात सामावलेला असतो. मानव, समाज आणि त्यांचं जीवन यांची सुसुत्रता या वाङ्मयप्रकारात केंद्रस्थानी असल्याने हे वाङ्मयप्रकार मानवी जीवनप्रवाहाशी समांतरपणे चालणारे आहेत. प्रस्तुत प्रकरणात 'साहित्य अकादमी' या केंद्र सरकारच्या स्वायत्त संस्थेतर्फे पुरस्कारप्राप्त कथात्मक वाङ्मयाचा विचार, त्याचे स्वरुप व मूल्यमापन विविधांगांनी करावयाचे आहे. कालक्रमानुसार पुरस्कारप्राप्त कांदबऱ्यांचे वेगळेपण सांगून, कादंबरीचे कथानक सांगतानाच ती कादंबरी लिहिण्याची पार्श्वभूमी विचारात घेता येईल, तसेच त्या लेखकाला लेखननिर्मितीस प्रवृत्त करण्याऱ्या प्रेरणा व त्या लेखकावर असणाऱ्या संस्कृतीचा प्रभाव विचारात घेवुन प्रस्तुत, लेखकाच्या अन्य लेखनाचा उहापोह करण्याचा मानस आहे.

मराठी वाङ्मयाच्या वैभवात अनेकविध कथात्मक साहित्याला अकादमीचा पुरस्कार दिला गेला आहे. यात वेगवेगळ्या कालखंडाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक मान्यवर साहित्यिकांच्या साहित्याचा समावेश असलेला दिसून येतो. मराठी साहित्याच्या प्रवाहात कथा, कांदबरी या कथात्मक साहित्यप्रकारांनी विशेष नवलौकिक मिळवलेला आहे. साहित्याच्या परिघात विविध विषयांना केंद्रस्थानी ठेवून अनेक कथासंग्रह व कादंबरीचे लेखन केले आहे. अशा सर्वोत्कृष्ट व परिपुर्ण लेखनाला 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार देऊन गौरविले जाते. असे साहित्य अकादमीचे पुरस्कार १९६० पासून ते आजतागायत मराठी साहित्य प्रकारांना दिले गेलेले आहेत.

## साहित्य आणि संस्कृती

साहित्य आणि संस्कृतीबरोबरच धर्म ही मूल्ये परस्परावलंबी आहेत. कारण संपूर्ण मानवी जीवनाला आकार देण्याचे कार्य उपरोक्त मूल्ये करतात. म्हणूनच साहित्यविश्वाला व्यापकता प्राप्त करुन देण्याबरोबरच त्यास विश्वात्मकतेचे लेणंही प्राप्त करुन देतात. भारतीय साहित्याला लोककथेचे, लोककलेचे लेणं लाभलेलचं आहे. हे आपण नाकारु शकत नाही. पण 'धर्म' ही मूल्ये अधिकच प्रभावशील राहिलेले आहे. अत्यंत समावेशक आणि व्यापक अर्थाने 'भारतीय साहित्यात याचा वावर आहे.'

भारतीय साहित्यात 'धर्म' हा शब्द रुढी, परंपरा, चालीरीती, नियम, कुळाचार, श्रद्धा, अंधश्रद्धा, संस्कृती या अर्थाने वापरला जातो. देशातील सर्वच म्हणजे कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललित आणि ललितेत्तर वाङ्मयात 'धर्म' या संकल्पनेचा वापर मोठया प्रमाणत असल्याचे दिसून येते.

धर्म या संकल्पनेचा प्रथम विचार करणे आवश्यक आहे. तद्नंतरच धर्माचा साहित्यावर कसा प्रभाव आहे. साहित्यामध्ये धर्माचा कसा शिरकाव होत गेला याचा शोध घेणे मला क्रमप्राप्त वाटते. धर्माची व्याख्या सांगताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "इष्टप्राप्त्यर्थ व अनिष्ट निवारणार्थ अलौकिक शक्तीची साधना किंवा आराधना म्हणजे धर्म" तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्माची संकल्पना अतिशय मार्मिकपणे मांडलेली आहे. "व्यक्तीला एखादी चांगली किंवा वाईट गोष्ट साध्य करण्यासाठीची देवाला करावी लागणारी अर्चना म्हणजे धर्म." अशी साधी-सोपी एखाद्या सामान्य माणसाला समजेल अशा शब्दांत धर्माची संकल्पना जोशी यांनी मांडली आहे.

कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी व्यक्तीकडे प्रथमत: जी गोष्ट प्राप्त करावयाची आहे, त्याविषयीची श्रद्धा असणे महत्वाचे आहे. श्रद्धा नसेल तर इष्ट कार्यात सफल होता येत नाही. धर्मात श्रद्धेला अनन्यसाधारण महत्व आहे. धर्मात ईश्वरी शक्तीचा अंश असतो असा भारतीय लोकांचा समज आहे. तो प्रत्येक धर्मात असतोच.

भारतीय कथात्मक साहित्यात रामायण, महाभारत या महान धर्मग्रंथाने संस्कारधर्म, आचार-विचार, विवेक, अविचार इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकला. त्यामध्ये जीवनदर्शनाचे यथार्थ वर्णन करण्यात आले आहे. धर्म, वाङ्मय या रुढ अर्थाने आपण याकडे पाहणे गरजेचे आहे. धर्मचिंतनातून वारकरी महानुभाव, दत्त, सुफी, संप्रदायांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केलेली आहे. तुकोबाची अभंगगाथा, ज्ञानोबाची 'ज्ञानेश्वरी गाथा' एकनाथाचे भारुड, रामदासांचे 'मनाचे श्लोक' हे आजही मराठी मनावर धर्म वाङ्मयातून प्रेरित झालेले साहित्याचे मौलिक रत्न आहे. हे रत्न प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक मराठी वाङ्मयाला उभारी देतात, पेलवितात, त्यांना वाङ्मयाची गुणात्मकता प्राप्त करुन देतात.

लेखक हा समाजजीवनाचा घटक असतो. त्यामुळे लेखकाला त्यांच्या कालचित्रात आलेले अनुभव शब्दरुपाने त्यास रोपन करुन त्यास वाङ्मयीन अंगाने एकत्रित करुन साहित्यकृतीद्वारे ते अनुभव वाचकांसमोर मांडत असतो. रुढ अर्थाने समाज म्हटला की, सांस्कृतिक पर्यावरण येणे क्रमप्राप्त असते. संस्कृती म्हटली की, धर्माचा भाग येणे साहजिकच आहे. रामायणातील दशरथाच्या दु:खाची तीव्रता महर्षी वाल्मिकींनी सत्ययुगात शब्दरुपांनी भातीय समाजासमोर अविष्कृत केली तर आधुनिक काळात कर्नल शिवाजी सावंत यांनी महाभारतातील कर्णाच्या दु:खाची गाथा 'मृत्यूंजय' या अभिजात कलाकृतीमधून प्राचीन काळातील धर्मस्थितीचा लेखाजोखा प्रकाशित केला. यावरुन आपणास धर्माचा साहित्यात कसा शिरकाव होत गेला याची जाणीव प्राप्त होते. धर्म, संस्कृती आणि समाज हे एकमेकांवर कसे परिणाम करतात हे सांगताना डॉ.सुमन बेहरे म्हणतात, "मनुष्य पुन्हा जीवनाला सामोरा जातो. हे धर्माचे सुप्त कार्य आहे. त्यामुळे सामाजिक जीवन सुरळीत चालू रहाते व माणसाच्या हातून असामाजिक वर्तन नाही, हा देखील सामाजिक नियंत्रणाचाच भाग आहे. समाज, धर्म आणि संस्कृती हे एका व्यवस्थेचे घटक असल्याने, एकमेकांवर परिणाम करतात, पण समाज आणि संस्कृती यांना आकार देण्याचे सुरुवातीचे कार्य धर्म करतो." डॉ.सुमन बेहरे यांनी मांडलेले विचार धर्म आणि संस्कृतीबरोबरच समाजजीवनाला कसे पुरक आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न डॉ.बेहरे यांनी केला आहे. मनुष्यावर धर्माचा पगडा जबरदस्त असतो. श्रद्धा आणि रितीरिवाज यांना तो खतपाणी घालत असताना मनुष्याला वेगवेगळया जीवनानुभवाला सामोरे जावे लागते. त्यावेळेस मनुष्याच्या हातून जे इष्ट किंवा अनिष्ट वर्तन घडेल ते असामाजिक स्वरुपाचे असते तर नकळतपणे ते समाज, धर्म आणि संस्कृती या घटकांवरच अवलंबून असते. पण धर्माला आकार देण्याचे कार्य समाज व संस्कृतीच करीत असतात. समाजाला आकार देण्याचे कार्य संस्कृती करते तर संस्कृती समाजाचे प्रतिबिंब साहित्यातून होत असते. आजच्या काळात आपण ज्या स्थळी आहोत तेथे साहित्यातील धर्मविषयक भूमिका विशद करणे हे प्रस्तुत संशोधनात महत्वाचे वाटते. त्यासाठी गोविंद पानसरे यांनी भारतीय समाजातील बहुजनांवर धर्माने लादलेल्या गुलामगिरीमुळे धर्म हे साहित्याचे प्रयोजन कसे होत गेले याचा विचार प्रकट करताना गोविंद पानसरे म्हणतात, "गुलामी लादणाऱ्या टाकाऊ परंपरा उद्ध्वस्त करणे ही सत्यसंशोधकांची गरज होती. मूर्तिभंजकाची भूमिका वठवणे त्यांना आवश्यकच होते. गुळगुळीत आणि मिळमिळीत भूमिका बहुजनांच्या हितसंबंधांचे रक्षण करु शकत नव्हती. बारीक-सारीक दुबळया हत्यारांनी त्यांचे भागत नव्हते. त्यांना दगड फोडणाऱ्या हातोडयांची आणि वडाराच्या सुतकीचीच गरज होती. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीच्या सत्यशोधक साहित्यिकांनी त्यांची लेखणी आणि वाणी दगडफोडयाच्या सुतकीसारखी वापरली. प्रस्थापितांनी या साहित्यासंबंधी बोंबाबोंब केली ती त्यामुळेच. त्यांनी लादलेल्या मूर्तीचे भंजन करणाऱ्या हातोड्यासंबंधीने बोंबलतील नाही तर काय करतील?"

गोविंद पानसरे यांनी बदलत्या प्रवाहात होणाऱ्या धर्मविषयी तत्संबंधीत घडामोडीचे अनास्थेपणाच्या भूमिकेतून आपले विचार व्यक्त केले आहे. जे लोक सामान्य जनतेच्या हिताचे धर्मविषयक भावनांचा गैरवापर करुन त्यांना गुलामगिरीसारख्या अमानवी तुरुंगात टाकतात. धर्माची स्थलकालसापेक्षताही बदलत जाऊन बहुजनांना पूर्णपणे पारतंत्र्यात रहावे लागते. त्यातून मुक्त होण्यासाठी दगड-धोडयांची आवश्यकता

लागत नाही. त्यासाठी साहित्यासारखे लेखन-वाणी हेच मुख्य हत्यार आवश्यकत असते. म्हणून 'धर्म' हे साहित्याचे प्रयोजन ठरते हे धर्मविषयक भूमिकेचे संक्षिप्त पण मार्मिक विवरण गोविंद पानसरे यांनी विशद केले आहे.

**सामाजिक आणि राजकीय प्रगती:**

मानवी समाजात राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक घटकांगांना अत्यंतिक महत्व आहे. लोकशाही स्वीकारलेल्या आपल्या देशात राजकीय जाणीव - जागृती वर्षानुवर्षापासून होत आलेली आहे. सामान्य भारतीय माणूसही या राजकीय जीवनाला अंगीकारुन आपले जीवन व्यथित करताना दिसतो. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात राजकीय जाणीव जागृती करण्याचे कार्य अखंडपणे प्रवाही असल्याचे दिसून येते. लोकहीतवादी न्यायमूर्ती राजनडे, लोकमान्य टिळक, यांनी राजकीय जागरुकता दाखवून परकीय राजवटीबद्दल तत्कालीन समाज मनात चीड निर्माण केली. सरकारला वास्तविक परिस्थिमीचे भान देऊन सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? असे प्रश्न विचारुन असंतोषाचे वारे पेटवले; तर जोतीबा फुले, आगरकर यांनी मनामनात बुध्दीवादी ज्योत पेटवली. 'केसरी', 'दर्पण', 'सुधारक','विविध ज्ञानविस्तार' यासारख्या वृत्तपत्रांनी राजकीय सामाजिक जागर सुरु ठेवला.

सामाजिक प्रगतीच्या उद्दीष्टाने महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेकांनी स्वतःला झोकून दिले. राजकीय सत्ता उपभोगन मानवी कल्याणाच्या महत्तम उद्दीष्टापर्यंत पोहचता येते. हा विश्वास कालांतराने क्षीण होत गेला. त्यामुळे राजकारण आणि त्याच्यातील परिवर्तन क्षमता प्रमाणात लोप पावत गेली. शिक्षणाने जागृत झालेला समाज सुसंस्कृत माणसाचे जगणे जगू लागला.महाराष्ट्रात प्रारंभीच्या काळात रयत, शिवाजी शिक्षण संस्थेच्या रुपाने सर्वच क्षेत्रात जाणीवेची कर्ती माणसे राज्याला लाभली. त्यांनी राजकारण, समाजकारण, उद्योग, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रात ग्रामीण स्तरापर्यंत नेतृत्व केले. सामान्य माणसांपर्यंत पोहचलेले राजकारण सामान्य माणसाला बाजूला सारुन राजकीय वर्चस्तव गाजविणाऱ्या माणसाचे अधि केंद्र बनले.

महानगरातला, शहरातला मराठी मध्यमवर्ग तर राजकारणातून दूर राहण्यातच धन्यता माणनू लागला. गांधीजींच्या हत्येने महाराष्ट्राच्या राजकारणात अकारण उच्चवर्गीय, मध्यमवर्गाकडे अविश्वासाने पाहिले जाऊ लागले. परिणामी मध्यमवर्ग राजकारणापासून अलिप्त होऊन नोकरी करण्यात धन्यता मानू लागला.या लोकांच्या राजकीय जीवनाशी परिचय होऊ लागला तो केवळ वर्तमानपत्रातूनच. त्यातील काहींनी या राजकीय जीवनाला आपल्या लेखनीचा विषय बनवून महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाला साहित्यातून अविष्कृत करण्यास प्रारंभ केला. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतूनही भिन्न भिन्न काळातील राजकीय जीवनाचे विविधांगी आणि प्रत्ययकारी चित्रण रेखाटले गेल्याचे पहावयास मिळते. अशा पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून साकारलेल्या राजकीय जीवनाचा विस्तृत आणि विवेवेचक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

विष्णू सखाराम खांडेकर हे नाव मराठी साहित्याच्या परिघात लोकप्रियतेच्या सर्वोच्च पातळीस सार्थ ठरलेले आहे. वि.स. खांडेकरांनी आपल्या 'ययाति' कादंबरीतून पौराणिक जीवनावर अतिशय प्रभावीपणे भाष्य केले आहे. खांडेकरांनी पौराणिक जीवन संदर्भाच्या रुपाने वर्तमान मानवी समाजातील वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तीचे प्रभावी आणि प्रत्ययकारी चित्रण केले आहे. ययाति या राजाच्या जीवनाला अभिव्यक्त करतानाच खांडेकरांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय जीवनाला आधोरेखित केले आहे. खांडेकरांनी या कादंबरीतून जीवनविषयक तत्वज्ञान मांडले आहे. भोवतालच्या जीवनाशी एकरुप होऊन खांडेकरांनी नेहमी विचार केलेला दिसून येतो. खांडेकरांनी भोवतालचे जीवन साकारताना या जीवनावर परिणाम करणाऱ्या घटना आणि घडामोडी मानवी समाज जीवनावर कशा आघात करतात ते सांगितले आहे. खांडेकरांच्या व्यक्तित्वावर नाही म्हटले तरी गांधीवादी विचारसरणाचा काही प्रमाणत का होईना प्रभाव पडलेला होता. खांडेकरांच्या 'ययाति' मध्ये राजकीय जीवनाचे काही पडसाद उमटलेले दिसतात या राजकीय जीवनाला खांडेकरांनी मानवी समाजातील आशा-आकांक्षा, प्रेरणा, लहरी, राग द्वेष या विविधांगी स्वरुपात अविष्कृत केले आहे. राजकीय परिस्थितीचे चित्रण कादंबरीतून कशा पध्दतीने होते याविषयी डॉ,चंद्रकांत बांदिवडेकर अतिशय नेमकेपणाने लिहितात-"सामान्यतः राजकीय परिस्थितीचे चित्रण दोन प्रकारे कादंबरीत येते. काही कादंबऱ्यातून राजकीय घटना त्यातील व्यक्तींच्या जीवनयात्रेत पार्श्वभूमीसारख्या येतात. लेखकाला चित्रित करायचे असतात काही व्यक्तीचे सुख-दुःखमय अनुभव. अशा व्यक्तिंचा जीवनप्रवाह काही वेळा राजकीय घडामोडीशी एकरुप होतो, पण पूर्णपणे ही एकरुपता टिकत नाही. तसेच त्यांची जीवनविषयक श्रेयस्करतेची कल्पना राजकीय आकांक्षापेक्षा अगदी वेगळया स्वरुपाची असते. अशा व्यक्तींच्या जीवनात राजकीय घटना थोडा काळा काही गती, काळी वळणे येऊन जातात. पण मग त्यांचा जीवनप्रवाह वैयक्तिक कल्पनांना भावनांनी व विचारांनीच भरुन वाहत जातो अशा व्यक्तींना राजकीय घटनांच्या उलाढालीत तुरुंगात जावे लागते वा मृत्यूमुखी पडावे लागते." डॉ.बांदिवडेकर यांनी कादंबरीतून साकारणारे राजकीय जीवन निव्वळ राजकीय जीवनाच्याच रुपाने साकार होत नसून ते मानवी जीवनातील विविध घटना-प्रसंगांच्या रुपाने अविष्कृत होऊन कशा पध्दतीने संपते ते अतिशय नेमकेपणाने मांडले आहे.

**मराठी साहित्य:**

अर्वाचिन मराठी वाङमयाच्या क्षेत्रात कथात्मक साहित्याचे योगदान अतुलनीय आणि वेधक आहे. या काळात मोठया प्रमाणात कथात्मक साहित्याची निर्मिती झाल्याचे दिसून येते. प्रारंभी भाषांतराच्या रुपाने अविष्कृत होणारे मराठी साहित्य पुढे पुढे स्वतंत्ररित्या निर्माण होऊ

लागले. समाजाच्या कक्षा जशा-जशा विस्तारु लागल्या तस-तसे मराठी साहित्य विस्तार पाऊ लागले. समाजाच्या वेगवेगळया क्षेत्रातून साहित्याची निर्मिती होऊ लागली. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाने समाजात लेखन प्रवृत्ती बळावत गेली आणि स्वतंत्र मराठी साहित्य लेखनाचे एक युग निर्माण झाले.

फडके, खांडेकरांनी आणि समकालीन लेखकांनी वेगवेगळया प्रकारात आपल्या अनुभवांना साकार करुन मराठी साहित्याच्या प्रवाहात मोलाची भर टाकली. साहित्याचा हा आलेख असाच उंचावत ठेवण्यासाठी पुढे वेगवेगळया संस्थांनी पुढाकार घेतला. साहित्य निर्मितीला प्रेरणा मिळावी म्हणून साहित्याच क्षेत्रात वेगवेगळे पुरस्कार देण्यात येऊ लागले. परिणामतः साहित्य लेखनाची प्रेरणा वाढीस लागून समाजाच्या विविध क्षेत्रातील लोक आपल्या जीवनानुभवांना शब्दबध्द करु लागले. साहित्याच्या परिघापासून अलिप्त असणाऱ्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण साहिततून मोठया प्रमाणात होऊ लागले. लेखक आपल्या अनुभवांना कथा आणि कांदबरीच्या स्वरुपात साकार करु लागले.

मानवी जीवनाच्या विशाल समुहपर साकार करण्या रे हे साहित्यप्रकार मराठी साहित्याच्या क्षेत्रात विशिष्ट नावा रुपाला येऊ लागले. मानवी जीवनाला समग्रतेने साकारणारे हे साहित्य समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक जीवनाचे स्तकर अतिशय कलात्मकतेने साकार करु लागले. साहित्याचा आणि समाजाचा सहसंबंध अशा विविधांगी जीवनचित्रणातून लक्षवेधी स्वरुपात कसाकार होऊ लागला. लेखक त्या समाजजीवनाचाच एक घटक असल्याने समाजात जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांना तो आपल्या कल्पकतेने आणि प्रतिभाशक्तीने शब्दगोपर करु लागला.

साहित्य अकादमी ही समक्र साहित्य क्षेत्राला प्रोत्साहित आणि प्रेरणा देणारी एक मोठी संस्था आज वर्तमान स्थितीतही साहित्याला उभारी देत आहे. याच साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन गौरविलेल्या कथात्मक साहित्यातील आर्थिक जीवनाचित्रणाचे स्वरुप विवेकाधिष्ठत भूमिकेतून विस्तृत प्रमाणात विचारात घेता येईल.

## निष्कर्ष

भारतीय समाज हा वेगवेगळया समुहात विस्तारलेला आहे. प्रत्येक मानवी समूह आपआपल्या रुढी-परंपरा, संस्कृतीची जोपासना करत जीवन जगताना दिसतात. या वेगवेगळया मानवी समूहातून जीवन जगणारे आपआपल्या भाषेची जोपासना करुन आपल्या जीवनाला आपल्या लेखनीद्वारे साहित्यकृतीतून अविष्कृत करणारे अनेक नामवंत साहित्यिक मराठी साहित्याची वर्षानुवर्षे सेवा करत आले आहेञ या साहित्यिकांच्या साहित्यसेवेचा मान-सन्मान करुन त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या अनेक संस्था कार्यरत असल्याचे दिसून येते. 'भारतीय साहित्याला जागतिक पातळीवर पोहचविणारी एक प्रतिष्ठित अकादमी म्हणून 'साहित्य अकादमी' सर्वसामान्य झालेली आहे.

साहित्याच्या अभिवृध्दीस अकादमी नेहमी तत्पर असल्याचे तिच्या कार्यविस्ताराहून प्रत्ययास येते. साहित्य अकादमी स्वतंत्र साहित्य निर्मितीस प्रोत्साहन तर देतेच. शिवाय साहित्याच्या क्षेत्रात इतर भाषांतील साहित्याही मोठया प्रमाणात यावे, म्हणूनही अकादमीच्या वतीने प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. अकादमीद्वारे सर्वोकृष्ट अनुवादासही पुरस्कार दिला जातो. त्याचबरोबर बालसाहित्याचा विकास व्हावा, नवोदित साहित्यिकांत लेखन प्रेरणा निर्माण मिळाव्यात. यासाठी अकादमीद्वारे देण्यात येणारी बालसाहित्य पुरस्कार युवासाहित्य पुरस्कार अत्यंत महत्वाचे ठरलेले आहेत.

पौराणिक, ऐतिहासिक, चरित्र, आत्मचरित्रात्मक, प्रादेशिक, ग्रामीण, दलित अशा वेगवेगळया साहित्य प्रवाहात मराठी साहित्याचे लेखन मोठया प्रमाणात झालेले आहे. या प्रवाहात काळाच्या कसोटीस उतरलेल्या आणि वाङ्‌मयीन गुणात्मक दर्जा प्राप्त केलेल्या भिन्नभिन्न प्रकारातील कलाकृतींना अकादमीने आजवर पुरस्कार दिलेले आहेत. या पुरस्कारप्राप्त कलाकृतीतील कथात्मक निवड कलाकृतींच्या स्वरुपाचे विस्तृत विवेचन करुन तिचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात केले असून या अभ्यासांती खालील काही निष्कर्ष मांडता आले.

साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन गौरविलेल्या कालाकृतींचे वर्गीकरणाच्या अनुषंगाने विचार केला आहे. अकादमीने १९५५ पासून ते आजतागायत संशोधन कथा, कविता, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, ललित अशा वेगवेगळया प्रकारातील कलाकृतींची परुस्कारासाठी निवड केलेली आहे. या कलाकृतीतून पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, ग्रामीण, दलित व्यक्तिचित्रणात्मक अशा वेगवेगळया जीवनांगाचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते. अशा वेगवेगळया प्रवाह प्रकारात आणि चित्रणात विभागल्या गेलेल्या या कलाकृतीचे वर्गीकरणाच्या अनुषंगाने विवेचन करुन या वर्गीकरणातील वैविध्यामुळे त्या पुरस्कारास कशा सिध्द झाल्या आहेत ते लक्षात येते शिवाय या वर्गीकरणाच्या अनुषंगाने सखोल विचार करताना जशा गुणात्मक बाजू ध्यानात येतात.

पुरस्कार प्राप्त कथात्मक साहित्यातील धार्मिक चित्रणाचा विविधांगी विचार स्पष्ट केला आहे. मानवी समाजात 'धर्म' या कल्पनेला अत्यंतिक महत्व आहे. माणसाच्या जगण्याची चौकट या संकल्पनेभावेती स्थिरावलेली आहे. धार्मिक आचरणाची जोपासना करणारा मानवी समाज सर्वत्र आढळतो. लेखक या समाज जीवनाचाच एक अविभाज्य घटक असल्याने या धार्मिक मुल्यात्मकतेचे संस्कार त्याच्यावर होणे क्रम प्राप्त ठरते. त्याचबरोबर या धार्मिक मुल्यात्मकतेचे पडसाद त्याच्या अभिव्यक्तीद्वारे चित्रित होणे संयुक्तिक वाटते.

## संदर्भ सूची

१. अर्जुनवाडकर लीला - भाषांतरमीमांसा, संपा.डॉ.कल्याण काळे, डॉ.अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९८.

२. असोलकर शरद - समीक्षेची क्षितीजे, (डॉ.द.भि.कुलकर्णी गौरव ग्रंथ), संपा.श्यामला मुजुमदार, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००८.

३. अपिने गजानन - अक्षर यात्रा २००९-२०१०, संपा.डॉ.दादा गोरे, आनंद लाटकर कॉम्प्-प्रिंट कल्पना, प्रा.लि.पुणे.

४. आंबेडकर बाबासाहेब - भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, (अनु.घनश्याम तळवडकर), सिध्दार्थ प्रकाशन पीपल्स एज्यू. सोसायटी, आनंद भवन,. मुंबई, खंड तृतीतय, भाग तिसरा, सहावेतत्तव आ.२०, वर्ष २००६.

५. जोशी प्र.न. - सुबोध भाषाशास्त्र, स्नेहल पब्लिकेशन, पुणे, १९९८.

६. जोशी वा.म. - विचार सौंदर्य, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९४०.

७. डॉ.टापरे पंडीत - कादंबरी संवाद, पद्मगंधा प्रकाशन, पुणे..

८. डॉ.व्यवहारे विद्या - साहित्य विमर्श, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००३.

९. डॉ.विभुते शंकर - स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०१०.

१०. वाघचौरे भीमराव - रा.रं.बोराडे यांचे साहित्य आणि आस्वाद, विहित प्रकाशन, औरंगाबाद.